आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ सप्टेंबर २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- २ हजार रुपयांपर्यंतच्या यूपीआय व्यवहारांवर बँकांना कोणतंही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शुल्क लावता येणार नाही अशी अर्थमंत्रालयाची घोषणा

- राज्यात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला, दीड दिवसांच्या गणपतींना आज भक्तिमय वातावरणात निरोप दिला जाणार

- अमेरिका अटी मान्य करत नाही, तोपर्यंत त्यांच्याशी वाटाघाटी न करण्याची इराणची भूमिका, तर इराणसमर्थित हुथी बंडखोरांचे सौदी अरेबियावर पुन्हा हल्ले

**आणि**

- भारत-अफगाणिस्तान यांच्यातला दुसरा टी-२० सामना आज रंगणार, भारतासमोर मालिकाविजयाचं लक्ष्य

**<><><><><>**

२ हजार रुपयांपर्यंतच्या यूपीआय व्यवहारांवर बँकांना कोणतंही शुल्क लावता येणार नाही, अशी घोषणा सरकारनं केली आहे. रूपे डेबिट कार्ड्सद्वारे केलेल्या व्यवहारांचाही यात समावेश आहे. अर्थ मंत्रालयानं याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. २ हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर बँका किंवा सेवा पुरवठेदार कोणतंही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शुल्क लावू शकत नाहीत, असं यात स्पष्ट करण्यात आलं आहे. गेल्या महिन्यातही सरकारनं याबाबतचं स्पष्टीकरण दिलं होतं.

**<><><><><>**

लहान मुलांच्या सुरक्षेशी संबंधित प्रकरणांची माहिती भारताच्या सायबर गुन्हेगारी पोर्टलला द्यायला मेटानं संमती दिली आहे. लहान मुलांचं लैंगिक शोषण आणि इतर धोकादायक मजकूर समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याबाबत सरकारनं घेतलेल्या कठोर भूमिकेनंतर मेटानं हे पाऊल उचललं आहे. लहान

मुलांची सुरक्षा ही कंपनीसाठी प्राधान्याची बाब असून त्यांच्याविरुद्ध कारवाया करणाऱ्या गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारच्या बरोबर काम करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत, असं मेटाच्या प्रवक्त्यानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. आज दीड दिवसांच्या गणपतींना भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात निरोप दिला जाईल. आरत्या तसंच गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशा जयघोषात घरगुती गणपतींच्या मूर्तींचं ठिकठिकाणी विसर्जन होईल. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आणि कोकणासह राज्यभरातल्या प्रमुख नद्या, तलाव, समुद्रकिनारे तसंच स्थानिक प्रशासनानं उभारलेल्या कृत्रिम तलावांवर विसर्जनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मुंबईत गर्दीचं नियोजन आणि पर्यावरण रक्षणाच्या उद्देशानं महानगरपालिकेनं घरगुती आणि ६ फुटांपर्यंतच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरात ३८० पेक्षा जास्त कृत्रिम तलाव उभारले आहेत. शिवाय गिरगाव, दादर, जुहू चौपाटी तसंच पवई तलावासारख्या सर्व नैसर्गिक विसर्जन स्थळांवरही विशेष सोयी सुविधा पुरवल्या आहेत. सुरक्षेसाठी विसर्जन स्थळांवर जीवरक्षक आणि आपत्कालीन पथकंही तैनात करण्यात आली आहेत. भाविकांच्या सोयीसाठी फिरती शौचालयं, पिण्याचं पाणी, निर्माल्य संकलनाची व्यवस्थाही केली आहे.

**<><><><><>**

भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय अभियंता दिवस साजरा करण्यात येत आहे. देशाच्या विकासात अभियंत्यांची भूमिका आणि योगदानाचं स्मरण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विश्वेश्वरय्या यांना आदरांजली वाहिली. देशाच्या उभारणीबद्दलचा विश्वेश्वरय्या यांचा विचार आजही नागरिकांना प्रेरणा देतो, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा आणि

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही विश्वेश्वरय्या यांना आदरांजली वाहिली आणि अभियंत्यांच्या योगदानाचा गौरवही केला.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था DRDO आणि उद्योगक्षेत्रातली भागीदारी भारताला संरक्षण उत्पादन क्षेत्राचं जागतिक केंद्र म्हणून उभं करेल, असा विश्वास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला आहे. नवी दिल्लीत विमर्ष २०२६ या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. क्षेपणास्त्रांपासून ते रडारपर्यंत, लढाऊ विमानांपासून ते पाणपुड्यांपर्यंत आणि इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणालीपासून ते कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत, सर्व क्षेत्रांमध्ये DRDOनं आपली क्षमता सिद्ध केली आहे, मात्र हे पुरेसं नाही, तर हा एक संयुक्त प्रयत्न आहे, ही बाब सिंह यांनी अधोरेखित केली.

***होल्ड... बाईट- राजनाथ सिंह***

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी संवेदनशीलतेला पर्याय ठरू शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदवी ही एक सुरुवात समजून संवेदनशीलतेनं समाजाची सेवा करण्यासाठी आपली शैक्षणिक गुणवत्ता आणि सामर्थ्य वापरावं असं आवाहन नीती आयोगाचे सदस्य डॉक्टर आर. बालसुब्रमण्यम यांनी आज केलं. अभियंता दिनानिमित्त नागपूरच्या सर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या २४व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी ५९ पीएचडीसह एकंदर १ हजार ५४७ पदव्या यावेळी देण्यात आल्या.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभेच्या २ जागांच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने आज उमेदवारांची घोषणा केली. नंदीग्राम इथून हसिरानी रथ आणि रेजीनगरमधून सखराव सरकार यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे. हसिरानी रथ या, मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचे माजी स्वीय सहायक चंद्रनाथ रथ यांच्या आई आहेत. मे

महिन्यात भाजपानं विधानसभा निवडणुकीत यश मिळवल्यानंतर काही दिवसांतच चंद्रनाथ रथ यांचा खून झाला होता. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी २ जागांवर विजय झाल्यानंतर नंदीग्रामची जागा सोडली होती, तर हुमायून कबीर यांनी नौदा मतदारसंघातून निवडून गेल्यानंतर रेजीनगरची जागा सोडली होती. या पोटनिवडणुकीचं मतदान ६ ऑक्टोबर रोजी, तर मतमोजणी ९ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याचा जवळचा सहकारी असलेल्या करमवीर सिंह याला पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. करमवीर सिंह याला कॅनडातून हद्दपार केल्यानंतर नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्याला ताब्यात घेतल्याची माहिती पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी विरोधातलं हे महत्वाचं यश असल्याचंही ते म्हणाले. हत्या, हत्येचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, शस्त्रास्त्र कायदा तसंच पासपोर्ट कायद्याअंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यांसह अनेक गुन्ह्यांत तो हवा होता, त्याच्या विरोधात लुक आऊट नोटिसही जारी केलेली होती असं यादव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इराणच्या अटी जोपर्यंत अमेरिका मान्य करत नाही, तोपर्यंत अमेरिकेशी कसल्याही वाटाघाटी करणार नाही, अशी भूमिका इराणनं घेतली आहे. इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव मोहसेन रेझेई यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधून ही भूमिका मांडली. इराणला तह करायचा आहे आणि त्यांच्याबरोबर चर्चा करायची अमेरिकेची तयारी आहे, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल केला होता, त्यावर इराणनं उत्तर दिलं आहे.

**<><><><><>**

येमनमधल्या इराणसमर्थित हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियावर पुन्हा एकदा हल्ले केले. सौदी अरेबियानं केलेल्या हवाई हल्ल्यांच्या प्रत्युत्तरात आपण सौदीच्या खमीस मुशायत इथल्या लष्करी हवाई तळावर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचा दावा हुथींनी केला आहे. या हल्ल्यांमध्ये या हल्ल्यात १३ नागरिक जखमी झाले असल्याचं सौदी अरेबियानं म्हटलं आहे. दरम्यान, आखाती अरब देशांनी इराणसोबत प्रस्तावित असलेली चर्चा पुढे ढकलली असून, यामुळे मध्य पूर्वेतला संघर्ष अधिक चिघळण्याची तसंच जागतिक तेल पुरवठ्याला धोका निर्माण होण्याची भीती वाढली आहे.

**<><><><><>**

भारत आणि कॅनडादरम्यान प्रस्तावित सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या वाटाघाटींची चौथी फेरी काल नवी दिल्ली इथं सुरू झाली. येत्या १८ सप्टेंबरपर्यंत ही चर्चा सुरू राहील. यादरम्यान दोन्ही देशांमध्ये वस्तुमाल आणि सेवांचा व्यापार, मूळ स्रोतासंबंधीचे नियम आणि व्यापारातले तांत्रिक अडथळे यांसारख्या प्रमुख मुद्यांवर चर्चा होणार आहे. याआधी या कराराच्या वाटाघाटीसाठीची तिसरी फेरी जुलै महिन्यात ओटावा इथं पार पडली होती.

**<><><><><>**

अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारनं परदेशी विद्यार्थी आणि पत्रकारांच्या वास्तव्याच्या कालावधीवर कठोर मर्यादा घालण्यासाठी आणलेल्या नवीन नियमाला मॅसॅच्युसेट्सच्या जिल्हा न्यायाधीशांनी तात्पुरती स्थगिती दिली आहे. या धोरणाची अंमलबजावणी झाली तर अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण व्यवस्थेचं नुकसान होऊ शकतं, असं निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवलं. या निर्णयामुळे अमेरिकेतल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ट्रम्प सरकारनं या वर्षी जुलै महिन्यात हा नियम मांडला होता. याअंतर्गत परदेशी विद्यार्थी आणि शैक्षणिक कारणांसाठी अमेरिकेला भेट देणाऱ्या

अभ्यासकांच्या व्हीसावर चार वर्षांची, तर पत्रकारांना जास्तीत जास्त २४० दिवसांची, तसंच चीनच्या पत्रकारांसाठी ९० दिवसांच्या वास्तव्याची मर्यादा प्रस्तावित होती.

<><><><>

वेल्स, स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंडच्या नेत्यांनी काल आपल्या स्वयंनिर्णयाच्या अधिकाराशी संबंधित एका करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारामुळे युनायटेड किंगडमच्या अखंडतेला धोका निर्माण होऊन त्याच्या विभाजनाची परिस्थिती उद्भवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काल वेल्सची राजधानी कार्डिफ इथं या करारासंदर्भात चर्चा झाली. यूकेमधल्या या तिन्ही प्रदेशांमधल्या राजकीय पक्षांनी अधिक स्वायत्तता आणि अंतिमतः स्वातंत्र्यांची मागणी केली आहे. दरम्यान बर्नहॅम यांच्या प्रवक्त्यानं हा धोका फेटाळून लावला आहे,

<><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे मुंबईच्या दिशेनं रवाना झाले आहेत. १० सहकाऱ्यांसह २ वाहनं आणि २ रुग्णवाहिका त्यांच्यासोबत आहेत. ४ दिवसांपासून जरांगे यांनी उपचार बंद केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे.

<><><><>

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या ३ सामन्यांच्या टी-२० क्रिटेक मालिकेतला दुसरा सामना आज नवी दिल्लीत होणार आहे. संध्याकाळी साडे ७ वाजता सामन्याला सुरुवात होईल. मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत १-०नं आघाडीवर आहे. आजच्या सामन्यातही विजय मिळवून मालिका जिंकण्यासाठी भारत प्रयत्नशील असेल, तर पहिल्या सामन्यातल्या पराभवानंतर दुसरा सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधायचा अफगाणिस्तानचा प्रयत्न राहील. मालिकेतला तिसरा सामना गुरुवारी होणार आहे.

<><><><>